मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा! : ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी–चिंचवड | सोमवार, दि.7 ऑक्टोबर 2024 | पान- 1


# तब्बल 18 कर्मचाऱ्यांकडून महापालिका सेवेचा राजीनामा..

## आस्थापनेवरील विविध संवर्गातील सेवेचा राजीनामा दिला : महापालिका प्रशासनाची डोकेदुखी वाढली...



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिका आस्थापनेवरील विविध संवर्गातील १८ कर्मचाऱ्यांनी महापालिका सेवेचा राजीनामा दिला आहे. सरळ सेवा भरतीमध्ये राज्य सरकारतच्या विविध विभागांमध्ये नियुक्ती मिळाल्याने या कर्मचाऱ्यांनी महापालिका सेवेला रामराम ठोकला आहे. पिंपरी विचवड महापालिकेच्या वतीने सरळसेवा भरतीअंतर्गत गट क मधील विविध संवर्गातील पदभरतीकरिता जाहिरात प्रसिद्ध केली होती. त्याला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळाला. त्यामुळे महापालिका प्रशासनाला राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये लेखी परीक्षा घ्यावी लागली. या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना कागदपत्र पडताळणीकरिता बोलावून, सर्व सोपस्कर पूर्ण झाल्यानंतर त्यांना महापालिका, आस्थापनेवरील रिक्त पदांवर नियुक्ती देण्यात आली आहे. महापालिकेच्या लिपिक पदावर निवड झालेल्या उमेदवारांपैकी काही जणांना महापालिका सेवेत रस नसल्याने हे उमेदवार कागदपत्र पडताळणीकरिता वेळत उपस्थित राहिले नाहीत. एका उमेदवाराने शारिरीक पडताळणी अहवाल पालिकेला सादर केला नाही. तर सहा उमेदवारांनी लिपिक पदावर रुजू होणार नसल्याचे कळविले आहे. त्यामुळे या ११ लिपिकांची निवड आधीच रद्द करण्यात आली आहे. नुकतेच सेवेत रुजू झालेले कर्मचारी अचानकपणे पालिकेच्या सेवेचा राजीनाम देत असल्याने ही बाब पालिका प्रशासनाची डोकेदुखी ठरत आहे. तर आता महापालिका प्रशासनाच्या नतीने प्रतीक्षा यादीतील उमेदवारांचा शोध घेत, त्यांना सेवेत रुजू करून घेण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

## महापालिका उभारणार ज्येष्ठ नागरिक भवन : आयुक्त शेखर सिंह

### ऑडिटोरियम, सुसज्ज पार्किंग व स्वतंत्र कार्यालयाची सुविधा असणार



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने शहरात ज्येष्ठ नागरिक भवन उभारणार असून विविध सोयी सुविधांनी युक्त असे भवन हे ज्येष्ठ नागरिकांसाठी त्यांच्या हक्काचे व्यासपीठ ठरणार आहे.

महापालिकेच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या जेष्ठ नागरिक भवनामध्ये त्यांच्यासाठी भव्य ऑडिटोरियम, सुसज्ज पार्किंग सुविधा, हॉल, ज्येष्ठ नागरिक संघासाठी स्वतंत्र कार्यालय, अशा अनेक सोयीसुविधा या भवनामध्ये नागरिकांसाठी उभारण्यात येणार आहेत.तसेच विविध योजना, उपक्रम, कार्यक्रम आणि जेष्ठ नागरिकांच्या दृष्टीने आवश्यक सर्व पायाभूत सोयीसुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, अशी माहिती महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने आकुर्डी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृह येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी खासदार श्रीरंग बारणे, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, माजी उपमहापौर शैलजा मोरे, माजी नगरसेवक बाळासाहेब ओव्हाळ, समाज विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, श्रीनिवास दांगट, पिंपरी चिंचवड ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या अध्यक्षा वृषाली मरळ, बाबुराव फुले, ईश्वरलाल चौधरी, शांताराम सातव, हेमचंद्र जावळे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद पवार, पोलीस उप निरीक्षक दिनकर गावडे, व्याख्याते अशोक देशमुख, डॉ. श्रीकृष्ण जोशी, आपटे काका, समाज विकास विभागाच्या रेश्मा पाटील, संतोषी चोरघे, प्रियंका रणसिंग, यांच्यासह मोठ्या संख्येने ज्येष्ठ नागरिक आणि महापालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.

प्रास्ताविक तानाजी नरळे यांनी तर सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक तसेच विकास गायकांबळे यांनी केले.

## उन्नती सोशल फाऊंडेशनच्या 'ग्रुप डान्स दांडिया स्पर्धेचे आ. अश्विनी जगताप यांच्या हस्ते उद्घाटन

### सामाजिक कार्याच्या अनुषंगाने 'हिरव्या' रंगाच्या धर्तीवर विविध देशी वाणांच्या रोपांचे वाटप



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपळे सौदागर येथे कार्यरत असणाऱ्या उन्नती सोशल फाऊंडेशन तर्फे आयोजित ग्रुप डान्स दांडिया स्पर्धेचे उद्घाटन चिंचवड विधानसभेच्या आमदार आश्विनी लक्ष्मण जगताप यांच्या हस्ते संपन्न झाले.

वरात्रीच्या नऊ रंगांच्या अनुषंगाने , प्रत्येक दिवसाच्या रंगाचे महत्त्व जाणत , सामाजिक कार्याच्या अनुषंगाने काल असलेल्या 'हिरव्या' रंगाच्या धर्तीवर विविध देशी वाणांच्या रोपांचे वाटप पिंपळे सौदागर , रहाटणी परिसरातील नागरिकांना करण्यात आले. या उपक्रमाबद्दल माहिती देताना , उन्नती सोशल फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ.कुंदाताई संजय भिसे म्हणाल्या ,"वैज्ञानिकांचा असा अंदाज आहे की 2050 पर्यंत जगातील 66% लोकसंख्या शहरी वातावरणात राहात असेल. शहरीकरण, तसेच बदलते हवामान, हे जागतिक स्तरावर एक आव्हान आहे जे मानवाच्या आरोग्यावर आणि कल्याणावर मोठ्या प्रमाणावर परिणाम करते. निरोगी आणि चैतन्यशील समाज स्थापन करण्यासाठी, झाडे अत्यंत आवश्यक आहे. गेल्या 30 वर्षांमध्ये, विज्ञानाने हे दाखवून दिले आहे की आपल्याला अगदी गॅलरीत कुंडीमध्ये लावलेल्या झाडांचा कसा फायदा होतो. त्यामुळेच नवरात्रीच्या मुहूर्तावर हा उपक्रम आम्ही नियमित राबवत असतो."

आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप म्हणाल्या , "स्त्रीत्वाचा जागर म्हणून , आपण सर्वजण नवरात्री उत्सव साजरा करीत असतो.सर्वत्र आदिमाया आदिशक्तीची निस्सीम आराधना होत असताना , उन्नती सोशल फाऊंडेशनने आपले वेगळेपण जपले आहे.उन्न'ती' चा गणेशोत्सव प्रमाणे उन्नतीचा नवरात्रोत्सव देखील अभिनव आहे. धार्मिकतेला उन्नतीने दिलेली पर्यावरणाची जोड ही पर्यावरण चळवळ पुढे घेऊन जाणारी आहे."

याप्रसंगी आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप, चेअरमन पवना सहकारी बँक जयनाथ काटे, पी के स्कुल संस्थापक जग्गनाथ काटे, गुलाब मेटे, शंकर चोंधे, राजू देवतारे, राजेंद्र जैस्वाल, डॉ सुभाषचंद्र पवार, रमेश वाणी, उन्नती सखी मंचच्या उपाध्यक्षा रश्मी मोरे यांच्यासह उन्नती सोशल फाऊंडेशनचे सर्व सदस्य , विठाई वाचनालयाचे सदस्य , जेष्ठ नागरिक संघाचे सदस्य आणि पिंपळे सौदागर मधील नागरिक , पदाधिकारी , कार्यकर्ते आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुण्यातील सर्व टेकड्यांवर बसवणार 'सर्च लाईट', सायरन सुद्धा असणार

**पोलिसांनी घाट आणि टेकड्यांवर सर्च लाईट, सायरन बसवण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला, आपत्कालीन परिस्थितीत हा सायरन महत्वाचा ठरणार आहे.**

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहर संस्कृतीचे शहर होते. यामुळे 'पुणे तिथे काय उणे' ही म्हण प्रचलित झाली. परंतु गेल्या काही वर्षांपासून पुणे शहराचा विस्तार मोठ्या प्रमाणावर झाला. पुणे शहरात औद्योगिक कंपन्या आल्या. त्यानंतर त्या कंपन्यांमध्ये काम करण्यासाठी देशभरातून कामगार पुण्यात आले. मग पुणे शहर माहिती अन् तंत्रज्ञानाची नगरी झाली अन् देशभरातून सॉफ्टवेअर अभियंते पुण्यात आले. त्यामुळे हळूहळू पुणे शहराची संस्कृती हरवत चालली आहे की काय? असा प्रश्न निर्माण होऊ लागला आहे. गेल्या पाच ते सात दिवसांत पुण्यात अत्याचाराच्या चार घटना उघड झाल्या आहेत. पुणे शहरातील गुन्हेगारी वाढली आहे. यामुळे पुणे पोलिसांनी आता शहरातील टेकड्यांवर आणि घाटांमध्ये सर्च लाईट बसवण्याचा निर्णय घेतला आहे. या टेकड्यांवर सायरनसुद्धा असणार आहेत.

पुण्यातील सर्व टेकड्यांवर "सर्च लाईट" बसवण्याचा निर्णय पुणे पोलिसांनी घेतला आहे. ३ ऑक्टोंबर रोजी बोपदेव घाटात एका २१ वर्षीय युवतीवर तिघांनी सामुहिक अत्याचार केला होता. त्या प्रकरणामुळे पुणे हादरले आहे. या प्रकरणातील तिन्ही आरोपींना अजून पकडण्यात पुणे पोलिसांना यश आले नाही. या प्रकरणानंतर पुणे पोलिसांनी घाट आणि टेकड्यांवर सर्च लाईट बसवण्याचा महत्वाचा निर्णय घेतला. तसेच शहरातील सर्व टेकड्यांवर सायरन सुद्धा बसवले जाणार आहेत. आपत्कालीन परिस्थितीत हा सायरन महत्वाचा ठरणार आहे.



### बोपदेव घाट बलात्कार प्रकरणात 100 जणांची चौकशी

» बोपदेव घाट बलात्कार प्रकरणात पोलिसांनी 100 पेक्षा जास्त संशयिततांची चौकशी केली. पुणे शहरातील सगळे डिटेक्टिव ब्रँच पोलीस आरोपींच्या शोधात आहेत. शहरातील सगळ्या रेकॉर्डवरच्या गुन्हेगार तपासणीचे काम हाती घेण्यात आले आहे. सगळ्या बाजूंनी 50 किलोमीटरपर्यंतच्या परिसरातल्या सीसीटीव्ही फुटेज चेक करण्यात येत आहे.

### बाणेर टेकडीवर झाली होती लूट

» काही दिवसांपूर्वी पुण्यातील बाणेर टेकडीवर एका तरुणाला काही चोरट्यांनी लुटले होते. पुण्यातील टेकड्यांवर होणाऱ्या चोऱ्या आणि लूट थांबवण्यासाठी आता पोलिसांकडून मोहीम सुरू करण्यात आली आहे. गुन्हेगार गुन्हे करण्यासाठी निर्जन स्थळ शोधतात. त्यामुळे गुन्हेगारांना गुन्हे करण्यासाठी कोणतीही जागा लावू नये, यासाठी पोलिसांनी पावले उचलली आहे.

### सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत

» पुणे शहरातील वाढती गुन्हेगारीमुळे विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पोलिसांना उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. निर्जनस्थळी पोलीस चौकी अद्यावत करावी, सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत, गस्त वाढवावी, तसेच वेळोवेळी सायरनचा वापर करावा, असे आदेश डॉक्टर गोऱ्हे यांनी दिले.

---

## बनावट बिले तयार करून जीएसटी न भरता शासनाची फसवणूक

**कंपनीच्या नावाची बनावट बिले तयार करून एक कोटी तीन लाख रुपयांचा जीएसटी न भरता राज्य शासनाची फसवणूक केली**

**पुणे | प्रतिनिधी**

कर्ज काढून देण्याच्या बहाण्याने एकाची कागदपत्रे घेत त्या आधारे शॉप ॲक्ट लायसन्स व उद्यम आधार काढले. त्यानंतर, कंपनीच्या नावाची बनावट बिले तयार करून एक कोटी तीन लाख रुपयांचा जीएसटी न भरता राज्य शासनाची फसवणूक केली. हा प्रकार मोशी येथे घडला. या प्रकरणी दीपक गोरक्षनाथ भगत (रा. शिव रोड, मोशी) यांनी फिर्याद दिली असून त्यानुसार मोहम्मद कैश रेहमानी (वय ३०, रा. कुदळवाडी, चिखली) याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. आरोपीने फिर्यादी कर्ज काढून देण्याचा विश्वास दाखवून फिर्यादीकडून आधार कार्ड, पॅन कार्ड, वीज बिल घेतले. त्यानंतर, या कागदपत्रांच्या आधारे आरोपीने फिर्यादीच्या नावे डी. बी. एन्टरप्राईजसेस कंपनीचे शॉप ॲक्ट लायसन्स, उद्यम आधार काढून ही कंपनी जीएसटी रजिस्टर केली. त्यानंतर, कंपनीच्या नावे बनावट बिले तयार करून कश्यप ट्रेडिंग कंपनी व इतर कंपनीस बिले दिल्याचे जीएसटी ऑफिसच्या पोर्टलवर नोंद केले. तसेच डी. बी. एन्टरप्रायजेस कंपनीवर काही रकमेचा व्यवसाय दाखवून त्यावरील एक कोटी तीन लाख ७१ हजार रुपयांचा जीएसटी न भरता फिर्यादी व शासनाची फसवणूक केली.




## अंदाजपत्रकात छेडछाड कराल ! तर खबरदार

**विभागप्रमुखांनी हस्तक्षेप केल्यास होणार कारवाई**

**पिंपरी | प्रतिनिधी**

मागील काळात लोकप्रतिनिधी अर्थसंकल्पातील निधींची पळवापळवी करत होते. गरज नसताना एखाद्या लेखाशिर्षावरील आर्थिक तरतूद अन्य कामांसाठी वळवून खर्ची घालण्याची पध्दत पडली होती. पुढे प्रशासकीय राजवटीत देखील अधिका-यांनी तोच कित्ता गिरवला.याला लगाम घालण्यासाठी महापालिकेच्या लेखा विभागाने नवीन आर्थिक धोरण आणले आहे. या धोरणामुळे विशिष्ट तरतुदींमध्ये परस्पर वाढ किंवा घट करणे, निधीची पळवापळवी करण्यास प्रतिबंध बसणार आहे.

चालू आर्थिक वर्ष संपुष्टात येताच १ एप्रिलपासून नवीन अर्थसंकल्पाची अंमलबजावणी सुरू होते. त्यावेळी भांडवली व महसुली कामांचा अचूक आढावा न घेता, नियोजन न करता विभागप्रमुख अर्थसंकल्पीय तरतुदींचा प्रस्ताव सादर करतात.त्याची अंमलबजावणी होताच तरतुदीत वाढ किंवा घट करण्याचे प्रस्ताव सादर केले जातात. अर्थसंकल्पामध्ये समावेश नसलेल्या नवीन कामांचे देखील प्रस्ताव सादर केले जातात. ही बाब अर्थिक शिस्तीच्या दृष्टीने हिताची नसल्यामुळे महापालिकेचा खर्च प्रमाणापेक्षा जास्त वाढतो.



आर्थिक शिस्त राखणे व आर्थिक नियोजनाच्या दृष्टीने योग्य असे नवीन धोरण लेखा विभागाने निश्चित केल्याचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा संचालक प्रवीण जैन यांनी सांगितले.

आर्थिक वर्ष सुरु झाल्यानंतर सहा महिने भांडवली, महसुली कामांच्या तरतुदींमध्ये वाढ किंवा घट आढळल्यास त्यास मंजुरी दिली जाणार नाही.अर्थसंकल्पात नवीन कामांचा समावेश करता येणार नाही. जर, आर्थिक अडचण निर्माण झाल्यास संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल.नवीन कामांचा समावेश करताना अंदाजे एकूण खर्चापैकी किमान २५ टक्के तरतूद करणे बंधनकारक आहे.

आर्थिक वर्षात काम पूर्ण होणार असल्यास खर्चाच्या संपूर्ण किंवा अर्ध्या रक्कमेची तरतूद करणे आवश्यक आहे. निविदा प्रसिद्धी ते कामाचा आदेश देण्यापर्यंत कोणतीही कार्यवाही संबधित विभागास करता येणार नाही.

मागील तीन वर्षातील सरासरी सुधारित निधीच्या सव्वापट रक्कमेपेक्षा जास्त रकमेस प्रशासकीय मान्यता एकाच वर्षी देता येणार नाही.कोणत्याही विभागाचे दायित्व (खर्च) संबधित विभागाने वितरीत केलेल्या निधीच्या मर्यादेबाहेर गेल्याने महापालिकेस आर्थिक अडचण निर्माण झाल्यास विभागप्रमुखांना जबाबदार धरले जाईल. सर्व विभागप्रमुखांनी दर महिन्याच्या पाच तारखेच्या आत लेखा विभागाकडे त्यांच्या दायित्वाची (बिलाची) अचूक माहिती सादर करावी.

# मलनिस्सारण वाहिन्यांचे शहरातील सर्वेक्षण पूर्ण

**पिंपरी-चिंचवड: महापालिकेतर्फे मलनिस्सारण विभागाकडून मैला सांडपाणी वाहिन्यांचे जाळे सुधारण्यात येणार असून त्याच्या बरोबरीने नाल्यांचे पुनर्जीवन करण्यात येणार आहे.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेतर्फे मलनिस्सारण विभागाकडून मैला सांडपाणी वाहिन्यांचे जाळे सुधारण्यात येणार असून त्याच्या बरोबरीने नाल्यांचे पुनर्जीवन करण्यात येणार आहे. त्यासाठी महापालिकेने शहरातील तब्बल १ हजार ६०६.६२ किलोमीटर मैलासांडपाणी वाहिन्यांचे सर्वेक्षण पूर्ण केले आहे. तसेच आत्तापर्यंत शहरातील ८२ हजार २०० चेंबरमध्ये शंभर मीटर आतमध्ये सीसीटीव्ही सोडून सर्वेक्षण करण्यात आले आहे.

पिंपरी- चिंचवड शहरातील अनेक भागांतील मैलासांडपाणी वाहिन्या जुन्या झाल्याने त्या वारंवार तुंबतात. त्यानंतर ते सांडपाणी बाहेर पडून सर्वत्र दुर्गंधी पसरते आणि आरोग्याचे प्रश्नही निर्माण होतात. त्यामुळे महापालिकेच्या मलनिस्सारण विभागाने सर्वेक्षणाचे काम हाती घेतले. सध्या शहरात असलेल्या मैलासांडपाणी वाहिन्या नगरपालिकेच्या काळातील म्हणजे ३५ वर्षांपूर्वीच्या आहेत. काही भागांत नव्याने वाहिन्या टाकण्यात आल्या आहेत. गेल्या काही वर्षांत लोकवस्ती वाढल्याने सांडपाणी मोठ्या प्रमाणात तयार होत आहे. मात्र, वाहिन्या जुन्याच असल्याने त्या तुंबण्याचे प्रकार सातत्याने वाढत होते. या पार्श्वभूमीवर महापालिकेने मध्य प्रदेशातील इंदूरच्या धर्तीवर शहरातील सर्व मैलासांडपाणी वाहिन्यांचे सर्वेक्षण केले. त्यासाठी डीआरए कन्सल्टंट्स यांची नेमणूक केली.

या सर्वेक्षणात मैलासांडपाणी वाहिन्यांचे सीआयएस मॉपिंग करण्यात आले आहे. त्यानुसार आठही प्रभागात किती किलोमीटरच्या वाहिन्या आहेत, याची अंतिम आकडेवारी उपलब्ध झाली आहे. तसेच आत्तापर्यंत शहरातील ८२ हजार २०० चेंबरमध्ये शंभर मीटर आत सीसीटीव्ही सोडून सर्वेक्षण करण्यात आले आहे.

या माध्यमातून व्हीडीओ काढण्यात येत असून जुन्या, नादुरुस्त वाहिन्यांची स्थिती समजणार आहे. सांडपाणी कोठे तुंबते, कशामुळे तुंबते याबरोबरच कोणत्या भागात अधिक क्षमतेच्या वाहिन्यांची गरज आहे हे स्पष्ट होणार आहे. त्यानुसार महापालिका मैलासांडपाणी वाहिन्या आणि नाल्यांचे काम करणार आहे. त्याचबरोबर सर्व मिळकतींचे मैलासांडपाणी ड्रेनेज व्यवस्थेत आणण्यासाठी सर्वेक्षण सुरू आहे. त्यानुसार ८९ हजार ३२७ मिळकतींचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून पुढील काम सुरू आहे.



### आठ नाल्यांवर कारवाई

» पावसाळ्यात पाणी तुंबण्याच्या घटना दरवर्षी घडत आहेत. त्यामुळे महापालिकेने यंदा शहरातील आठ मोठ्या नाल्यांवरील अतिक्रमणांवर कारवाई करण्याचे नियोजन केले आहे. त्यानुसार 'अ' प्रभागातील आकुर्डी नाला, 'ब' मधील रावेत गावठाण, 'क' मधील सँडविक, लेंडीचा नाला, 'ड' मधील वाकडगाव, 'ई' मधील मोशी, 'फ' मधील रुपीनगर, 'ग' मधील रहाटणी, 'ह' प्रभागातील नेहरुनगर नाल्यावरील अतिक्रमणावर कारवाई करण्यात येणार आहे.

### 'स्वच्छता ही सेवा' पंधरवडा

» महापालिकेच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या 'स्वच्छता ही सेवा' पंधरवडा निमित्त स्वच्छ सांस्कृतिक उत्सव आयोजित करण्यात येणार असून ख्यातनाम सिने अभिनेत्री मृण्मयी देशपांडे यांची या उत्सवाला विशेष उपस्थिती राहणार असल्याची माहिती आरोग्य विभागाचे सहाय्यक आयुक्त अजिंक्य येळे यांनी दिली आहे.

# घरामध्ये बसून विदेशात पाठवा दिवाळी फराळ; पोस्टाचा नवा उपक्रम

**कुरियरचे जाळे सर्वत्र नसल्याने काही जणांना अडचण येत असे. आता टपाल विभाग दिवाळी फराळ परदेशात वेळेवर पोहोचविण्यासाठी सज्ज आहे.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

परदेशातील आपल्या नातेवाईकांना दिवाळीचा फराळ वेळेवर पोचावा यासाठी घाई गडबड असते. आतापर्यंत खासगी कुरियरतर्फे हा फराळ परदेशात पोहोचत असे आणि तेथील नातेवाईकांची दिवाळी गोड होत असे. मात्र, कुरियरचे जाळे सर्वत्र नसल्याने काही जणांना अडचण येत असे. आता टपाल विभाग दिवाळी फराळ परदेशात वेळेवर पोहोचविण्यासाठी सज्ज आहे.

दिवाळीनिमित्त टपाल विभागाने नावीन्यपूर्ण उपक्रम राबविला असून फराळाचे पदार्थ दिल्यानंतर लगेच पॅकिंग करून परदेशात पाठविण्याची सोय केली आहे. विशेष म्हणजे फराळ पाठविण्यासाठी मुहूर्त लागत नाही. वेळ नसल्यास ज्यांना कार्यालयामध्ये जाता येत नाही अशा नागरिकांसाठी घरी येऊन फराळ पार्सल घेऊन जाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यासाठी पोस्टमन घरी येऊन फराळाच्या पदार्थांचे पार्सल विनामूल्य घेऊन जाणार आहेत.

नोकरी आणि शिक्षणानिमित्त पुण्यातून परदेशामध्ये जाणाऱ्यांची संख्या खूप मोठी आहे. परदेशामध्ये वास्तव्यास असलेल्या प्रत्येकालाच दिवाळीच्या सणासाठी भारतामध्ये किंवा पुण्यामध्ये व्यावहारिकदृष्ट्या शक्य होत नाही. ही बाब ध्यानात घेऊन जगभरातील प्रियजनांना फराळाचे पदार्थ, भेटवस्तू पाठवून त्यांचा दिवाळीचा आनंद द्विगुणित करतो. त्यासाठी टपाल विभागाने पार्सल परदेशात पोहोचविण्याची जबाबदारी उचलली आहे. शहरातील सर्व टपाल कार्यालयांमध्ये दिवाळी फराळ परदेशामध्ये पाठविण्याची सुविधा, तसेच फराळाचे पॅकिंग करण्याची सोयीही उपलब्ध आहे. टपाल विभागाने मागील वर्षी दिवाळीनिमित्त ७ हजार ५०० किलो फराळ पुण्यातून परदेशात अगदी वेळेत पाठविण्याचा विक्रम केला होता.



पुणे शहर मुख्य पोस्ट ऑफिस, चिंचवड पूर्व, मार्केट यार्ड , पर्वती शिवाय इतर कार्यालयात फराळाच्या बॉक्सचे पॅकिंग करण्यासाठी उपकरणे बसविण्यात आली आहेत. त्याद्वारे काही मिनिटांमध्ये फराळ आणि भेटवस्तूंचे पॅकिंग करून हे बॉक्स लगेचच परदेशात पाठविले जाणार आहेत.

याबाबत पुणे विभागाचे पोस्टमास्टर जनरल रामचंद्र जायभाये पुणेकरांना उद्देशून म्हणाले की, ह्या नव्या सेवेचा अधिकाधिक पुणेकरांनी लाभ घेऊन दिवाळी फराळ आपल्या नातेवाईकांना पाठवावा. आजपासून ते दिवाळीपर्यंत फ्री पिकअपच्या सेवेसाठी ९८३४४८२१०५ व ७०२८००७२३५ या क्रमांकावर सकाळी ९ ते संध्याकाळी ७ पर्यंत संपर्क करू शकतात.

# स्वराज्य पक्षाच्या शहराध्यक्षपदी विजय जरे

**छत्रपती संभाजीराजे भोसले यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले**



**पिंपरी | प्रतिनिधी**

स्वराज्य पक्षाच्या पिंपरी-चिंचवड शहराच्या शहर अध्यक्षपदी विजय जरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. स्वराज्य पक्षाचे महाराष्ट्राचे अध्यक्ष छत्रपती संभाजीराजे भोसले यांच्या हस्ते सदर नियुक्तीपत्र विजय जरे यांना देण्यात आले आहे.

सदर नियुक्तीपत्रात म्हटले आहे की, छत्रपती संभाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली स्वराज्याची ध्येय धोरणे तळागाळापर्यंत पोहोचून संघटन बांधणी भक्कम करण्यासाठी आपण अथक परिश्रम घ्याल, या अपेक्षा सह आपल्या भावी वाटचालीस शुभेच्छा. तसेच आपण आपल्या पक्षासाठी उभे राहाल, असे अपेक्षा करत आपली नियुक्ती करण्यात आली आहे.

तसेच ही नियुक्ती पुढील वर्षभराकरिता आहे. तसेच पुढील कार्याचा आढावा घेऊन निर्णय घेण्यात येईल, असे देखील नियुक्तिपत्रात पश्चिम महाराष्ट्र सचिव प्रशांत पाटणे यांनी म्हटले आहे.


# अप्रशिक्षित व्यक्ती रक्त गोळा करत असल्याचे आले समोर

**अनेक हेल्थकेअर स्टार्टअप्स हे वैद्यकीय ज्ञान किंवा प्रशिक्षण नसलेल्या लोकांना कामावर घेतात आणि त्यांना रक्त गोळा करण्याचे काम सोपवतात.**

**पुणे | प्रतिनिधी**

वैद्यकीय तपासणीसाठी तुमच्याकडे येऊन रक्त गोळा करणारी व्यक्ती असे करण्यास पात्र म्हणजे योग्यरित्या प्रशिक्षित आहे का? तो किंवा ती नक्कीच पात्र होती, असे तुम्हाला वाटेल. तथापि, अनेक हेल्थकेअर स्टार्टअप्स हे वैद्यकीय ज्ञान किंवा प्रशिक्षण नसलेल्या लोकांना कामावर घेतात आणि त्यांना रक्त गोळा करण्याचे काम सोपवतात. काही प्रकरणांमध्ये त्यांना रुग्णाच्या शरीरात उपकरणाचे रोपण करण्याची परवानगीदेखील दिली जाते. यातील बहुतेक तथाकथित फ्लेबोटोमिस्ट फक्त दहावी किंवा बारावी पास आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, दहावी-बारावी नापास असलेलेदेखील असे काम करीत असल्याचा अतिशय गंभीर प्रकार समोर आला आहे.

पुण्यातील एका कंपनीचे प्रमुख असलेले ५८ वर्षीय चिराग बक्षी यांनी 'शुगरफिट' या बंगळुरू येथील हेल्थकेअर स्टार्टअपवर या संदर्भात गंभीर आरोप केले आहेत. योग्य वैद्यकीय निरीक्षण आणि काळजी न घेता बक्षी यांच्या शरीरात 'शुगरफिट'मार्फत एक यंत्र प्रत्यारोपित करण्यात आले. याचा प्रचंड त्रास बक्षी यांना झाला.



### महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलचा इशारा

» महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलचे अध्यक्ष डॉ. विंकी रुघवानी म्हणाले, "मधुमेह बरा करण्याचे मोठे दावे करणाऱ्या किंवा रुग्णांची दिशाभूल करण्यासाठी जाहिराती करणाऱ्या अशा केंद्रांशी संबंधित डॉक्टरांवर कौन्सिल कारवाई करू शकते. मधुमेह पूर्ववत करण्याचे आश्वासन देऊन आणि अशा आघातास कारणीभूत असलेल्या रुग्णांची दिशाभूल केल्यास गंभीर कायदेशीर परिणाम होऊ शकतात. येथे रुग्णाच्या गोपनीयतेचे उल्लंघन केले गेले आहे . बक्षी यांची वैयक्तिक माहिती त्यांच्या संमतीशिवाय वापरली जात असल्याचे समोर आले आहे. गोपनियतेचा अशा प्रकारचा भंग हे गंभीर आहे. आम्ही वैद्यकीय केंद्रांना रुग्णांशी संपर्क साधताना काळजी घेण्याचे आवाहन करतो."

या संदर्भात 'सीविक मिरर'ला माहिती देताना ते म्हणाले, "या संदर्भात मी केवळ मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया आणि इंडियन मेडिकल असोसिएशनलाच तक्रार केली नाही, तर वैद्यकीय प्रक्रिया करण्यासाठी अपात्र फ्लेबोटोमिस्ट्सना नियुक्त केले जात असल्याचा व्यापक मुद्दाही मांडला आहे. ही बाब अतिशय गंभीर आहे. कोणत्याही वैद्यकीय निरीक्षणाशिवाय अशा कंपन्या रुग्णांच्या शरीरात यंत्र प्रत्यारोपित करतात. यामुळे रुग्णांना त्यांना होणाऱ्या तीव्र वेदनांची सदर कंपन्या कल्पनाही करू शकत नाहीत.

### वैद्यकीय देखरेखीशिवाय रक्त गोळा करणे बेकायदेशीर

» या त्रासदायक अनुभवानंतर बक्षी यांनी एमसीआय आणि आयएमएकडून 'शुगरफिट'वर कठोर कारवाईची मागणी केली आहे. महाराष्ट्र असोसिएशन ऑफ प्रॅक्टिसिंग पॅथॉलॉजिस्ट अँड मायक्रोबायोलॉजिस्ट (एमएपीपीएम) चे अध्यक्ष डॉ. संदीप यादव, ज्यांनी अशा गैरप्रकारांच्या गंभीर धोक्यांबद्दल चेतावणी दिली "शहरभर आणि त्या पलीकडे, अप्रशिक्षित व्यक्तींना वैद्यकीय प्रक्रिया करण्यासाठी नियुक्त केले जात आहे. हे बेकायदेशीर आहे. अशा क्रिया केवळ नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांच्या देखरेखीखालीच केल्या जाऊ शकतात. जर रुग्ण ॲनाफिलेक्टिक शॉकमध्ये गेला तर कोण जबाबदार असेल? यासाठी तातडीने कायदेशीर कारवाईची गरज आहे," असेदेखील त्यांनी निदर्शनास आणून दिले.

" वैद्यकीय प्रक्रिया करण्यासाठी अप्रशिक्षित व्यक्तींना नियुक्त केले जात आहे. हे बेकायदेशीर आहे. अशा कॉर्पोरेट केंद्रांबद्दल आम्ही वेळोवेळी तक्रार केली आहे, जे रुग्णांचा जीव धोक्यात घालू शकणारे कर्मचारी नियुक्त करतात. परंतु त्याचा काही फायदा झाला नाही. सरकारी संस्थेने या संदर्भात पुढाकार घेऊन असे बेकायदेशीर काम करणाऱ्या केंद्रांपासून रुग्णांना वाचवले पाहिजे.

- डॉ. संदीप यादव, अध्यक्ष, महाराष्ट्र असोसिएशन ऑफ प्रॅक्टिसिंग पॅथॉलॉजिस्ट आणि मायक्रोबायोलॉजिस्ट .

" मधुमेह बरा करण्याचे मोठे दावे करणाऱ्या किंवा रुग्णांची दिशाभूल करण्यासाठी जाहिराती करणाऱ्या अशा केंद्रांशी संबंधित डॉक्टरांवर मेडिकल कौन्सिल कारवाई करू शकते. मधुमेह बरा करण्याचे आश्वासन देऊन रुग्णांची दिशाभूल केल्याप्रकरणी मोठी कायदेशीर कारवाई शक्य आहे.

- डॉ. विंकी रुघवानी, अध्यक्ष, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल

# घाटरस्त्यावर पथदिवे, पोलीस चौकी करा : माजी राज्यमंत्री विजय शिवतारे


**पालकमंत्री अजित पवार आणि पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांना तातडीने पत्रव्यवहार केला आहे.**

**पुणे | प्रतिनिधी**

बोपदेव घाटात झालेल्या सामुहिक बलात्कार प्रकरणानंतर घाटातील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी काही अत्यावश्यक उपाययोजना करण्याची मागणी शिवतारे यांनी माजी राज्यमंत्री विजय शिवतारे यांनी पालकमंत्री अजित पवार आणि पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांना तातडीने पत्रव्यवहार केला आहे.

रात्रीच्या वेळी बोपदेव घाटात व दिवे घाटात मोठ्या प्रमाणात युवक व युवती आढळून येतात. या रस्त्यावर दोन अभियांत्रिकी महाविद्यालये आहेत. या महाविद्यालयांनी घाट परिसरात रात्रीच्या वेळी फिरण्यास विद्यार्थ्यांना मज्जाव करावा यासाठी कॉलेज प्रशासनाशी देखील मी चर्चा करणार आहे. या दोन्ही घाटात रस्त्याच्या कडेला बांधण्यात आलेल्या कट्ट्यांवर बसून अनेक जोडपी येथे मद्यपान करतात. येथे अशा स्वरुपाची वर्दळ वाढण्याचे मुख्य कारण म्हणजे घाटात असलेले अंधाराचे साम्राज्य आणि निर्मनुष्य परिसर. असाच काहीसा प्रकार दिवे घाटाच्या परिसरात देखील असतो.

कधी कधी या भागात बिबटे थेट रस्त्यावर येतात. या गोष्टी लक्षात घेऊन या दोनही घाटात जिल्हा नियोजन समितीकडून पथदिव्यांसाठी तातडीने निधी मंजूर करावा. या घाटात प्रकाशव्यवस्था असेल तर जोडपी किंवा मद्यपी याठिकाणी उगाच रेंगाळणार नाहीत. याशिवाय दोनही घाटांच्या पायथ्याला किंवा सुरुवातीला पोलीस चौकी उभारून तिथे रात्रीच्या वेळी पोलीस उपलब्ध राहतील, अशी व्यवस्था करणे आवश्यक आहे. त्यामुळे पोलीस चौकी उभारण्याबाबत मी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही मागणी करणार असल्याचे शिवतारे यांनी सांगितले आहे.



### अभियांत्रिकी महाविद्यालयांनी काळजी घ्यावी

» या रस्त्यावर दोन अभियांत्रिकी महाविद्यालये आहेत. या महाविद्यालयांनी घाट परिसरात रात्रीच्या वेळी फिरण्यास विद्यार्थ्यांना मज्जाव करावा यासाठी कॉलेज प्रशासनाशी देखील मी चर्चा करणार आहे.